# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

### अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र

नं. AMMC/FIRE-NOC/0248/22-23
कार्यालय अग्निशमन विभाग
जा.क्र. अ.म.न.पा./ अशवि /248 /२०23
दिनांक : 21/02/2023

प्रति, नारायणा विद्यालयम
एम.आय.डी.सी.पोलिस चौकी मागे,बडनेरा जुना बायपास,अमरावती

संदर्भ :- (१) ना-हरकत मिळविण्याकरिता आपला प्राप्त अर्ज दि. 21/02/2023

(२) इंडेन फायर प्रोटेक्शन,अमरावती या प्राधिकृत अभिकर्ता द्वारा प्राप्त फायर सेफ्टी ऑडिट रिपोर्ट दि. 09/02/2023

## ना - हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / सौ. सचिन मुरलीधर भेलकर

यांनी संदर्भ १ चे विनंती अर्जानुसार व संदर्भ २ चे शासन प्राधिकृत अभिकर्ता / संस्थेद्वारे अग्निसुरक्षा ऑडिट करून Educational Insititte या व्यवसायासाठी अग्निशमन विभाग म.न.पा. अमरावती यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे. तसेच दि. 21/02/2023 ला तांत्रिक तपासणी अग्निशमन अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी केली. त्यानुसार खालील नियम व अटी शर्तींच्या आधीन राहून आपणास ना - हरकत प्रदान करण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक अधिनियम २००६-०९ अन्वये आपणास आगप्रतिबंधक उपाय योजना व यंत्रणा यामधील तरतुदीची अनुपालन करण्यात यावे व NBC - २०१६ नियमांची पूर्तता करण्यात यावी तसेच राज्य शासन व अमरावती महानगर पालिकेने वेळोवेळी केलेले नियम व त्यामधील बदल आपल्यावर बंधनकारक राहील.
२) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्निसुरक्षा व्यवस्था करावी लागेल. आवश्यक त्या ठिकाणी धूम्रपान निषेद फलक लावावे व महत्वाचे दूरध्वनी क्रमांक उदा. पोलिस नियंत्रण कक्ष अग्निशमन दल, अँब्युलन्स इ. चा फलक दर्शनिय ठिकाणी लावावे.
३) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण, मा. संचालक अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले अनुज्ञाप्तीधारक अभिकरणांकडून जानेवारी ते जुलै असे वर्षातून दोन वेळा करून घेणे बंधनकारक राहील.
४) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी माहिती देण्यात यावी व सराव घेण्यात यावा.
५) आगप्रतिबंधक उपाय योजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी सर्व विद्युत उपकरणे खात्रीच्या अभिकर्त्याकडून तपासून घ्यावेत.
६) आगप्रतिबंधक उपाययोजना बाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमन दल मार्फत केव्हाही करण्यात येईल. अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र सोबत इतर विभागाचे आवश्यक ते परवाने घ्यावे.
७) नाहरकत प्रमाणपत्राची वैद्यता १ वर्षाची राहील.
८) वरील प्रमाणे व्यवस्थेअभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवस्थापनाची (अर्जदार)राहील.
९) दरवर्षा नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.
१०)सदर अधिनियमाच्या किंवा त्यासाठी केलेल्या नियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या उल्लंघनाचा या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनवये काढलेल्या कोणत्याही आदेशाची किंवा कोणत्याही नोटीसच्या किंवा कोणत्याही निर्देशाच्या आवश्यकतेनुसार अनुपालन करण्यात कसुर केल्यास संबंधित प्रकरणी कलम ७,८,३६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.
११)वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

उपरोक्त प्रमाणपत्र हे दि. 20/02/2024 पर्यंत वैध राहील

टीप : १) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण दरवर्षी करणे अनिवार्य आहे.
२) शासन नियमानुसार जानेवारी आणि जुलै महिन्यात फॉर्म बी सादर करणे अनिवार्य आहे

AS. Dadgal
22/02/2023

आयुक्त / उपायुक्त / अग्नि अधिक्षक
अमरावती महानगरपालिका, अमरावती